# लग्नापूर्वीची पारदर्शकता

" आज संपदा येणार आहे तुमच्याकडे. तिला जरा चांगलं समजून सांगा. अहो जराही घाई नाही तिला लग्नाची.

आणि प्रत्येक मुलाला नाकारायचं म्हणजे काय? माझी तर झोपच उडाली आहे. आणि तुम्ही जे लेखांमध्ये लिहिता न

म्हणजे adjust करायला पाहिजे वगैरे ते सगळं झालाय हो सांगून. पण कस असतं न सोनारानं कान टोचलेले बरे असतात. शेवटी आमच्यापेक्षा तुम्ही असं वेगळ काय सांगणार आहात हो ? आमची काय लग्न झाली नाहीत कि काय? आम्हालाही अनुभव आहेच आमच्या एकुलत्या एक लग्नाचा ! चांगली जादू घडली पाहिजे तुमच्या समुपदेशनाने ! म्हणजे घरी येताक्षणीच लगेच स्थळांची यादीच टाकते तिच्या पुढ्यात आणि उडवून टाकते लग्नाचा बार पुढच्या महिन्यात ! " ------- संपदाची आई बोलतच राहिली होती. माझ्या मनात आल कि माझ्याशी सुद्धा

या बाई इतकं बोलत आहेत कि स्वतःच्या मुलीला या किती इरिटेट करीत असतील.

समुपदेशनाच्या बाबतीत नेहमी जाणवणारी हि गोष्ट म्हणजे अनेकदा लोकं सांगतात, की अमुक अमुक व्यक्तीला असं असं सांगा बरका. अनेकांना वाटते कि समुपदेशन म्हणजे जादूची कांडी असते. समुपदेशनासाठी जाऊन आले कि माणूस आमूलाग्र बदलून जातो असे वाटत असते. वरच्या उदाहरणामध्ये देखील संपदाच्या आईने तिला काय सांगा हे मला सांगितले आणि परत वर ऐकवले सुद्धा की तसही तुम्ही वेगळ काय सांगणार?

हा नेहमी येणारा अनुभव असतो. आणि समुपदेशन म्हणजे सोनाराने टोचलेले कान असाही एक गैरसमज आढळतो.

याचे एक महत्वाचे कारण म्हणजे, समुपदेशक पालकांपेक्षा काही वेगळा विचार करत असतील, काही वेगळी दिशा देऊ शकत असतील असे वाटत नाही.

खरं सांगायचं तर समुपदेशन म्हणजे काही सांगणं नव्हे, किंवा कोणता सल्ला देणंही नव्हे तर होणाऱ्या परिणामांची जाणीव करून देण, काही बाबतीतली माहिती देण होय. समुपदेशनामध्ये कृतीला महत्व असतं.

सल्ला आपण अशा गोष्टींसाठी घेतो कि जिथे तांत्रिक गोष्टींचे ज्ञान आपल्याला नसते. पण वैवाहिक जीवन दोघांचे असते. तांत्रिक गोष्टींना तिथे स्थान नसते. त्या नात्यात परंपरा, रीतीरिवाज, जीवनमूल्ये, स्वभाव, जीवनशैली कामजीवन, दोघांची विचारधारा, भावनिक बंध, प्रायव्हसीच्या कल्पना अशा अनेक गोष्टी असतात.आणि ज्या फक्त त्या दोघांच्या असतात. आणि त्या कशा असाव्यात आणि कशा नसाव्यात,याचा निर्णय सर्वस्वी त्या दोघांचा असतो.

अनेकदा मुले आणि मुली ज्या गोष्टी कदाचित घडणारच नाहीत त्याबद्दलही चर्चा करत असताना दिसतात.

सुजय आणि कल्पना नुकतेच बाहेर भेटले होते. त्या आधी एकदा सुजय च्या घरी दोन्ही कुटुंबातली माणसे भेटली होती. आज त्यांची दुसरी भेट होती. बोलता बोलता सुजय म्हणाला," जर घरी गरज भासली तर नोकरी सोडशील कि नाही?"

कल्पना म्हणाली," नाही मी नोकरी कधीच सोडणार नाही"

-----. " अग पण शेवटी घर महत्वाचे नाही का?"

" नाही पण माझी नोकरी दुय्यम मानलेली मला नाही चालणार. मीच का सोडायची नोकरी? "

"अग पण घरात कदाचित कुणाच आजारपण असेल आणि शक्य नसेल तेव्हा नोकरी साठी बाहेर जाण, तर काय करशील? आणि असेच जर तुझे विचार असतील तर मलाही निराळा विचार करावा लागेल."

शेवटी त्यांचा हा वाद त्यांच्या घरापर्यंत पोचला आणि दोन्ही आई वडिलांच्या म्हणण्यानुसार दोघेही समुपदेशनासाठी माझ्यापर्यंत पोचले. त्यांच्या शी गप्पा मारता मारता मला त्यांच्यातला हा मतभेदाचा मुद्दा जाणवला. मी त्या दोघांना म्हटलं अरे कदाचित हा मुद्दा पुढे उद्भवणार सुद्धा नाही. आजारपण येईलच असं नाही. आणि आले तर त्यावेळी बघता येईल न? शिवाय कल्पना, आणि सुजय, त्यावेळी कदाचित तुम्हाला दोघांनाही असे वाटू शकते कि काही दिवस आलटून पालटून रजा घेऊन प्रश्न सोडवणे शक्य होईल. तुमच्या मध्ये तयार होणाऱ्या केमिस्ट्री वर या गोष्टी अवलंबून आहेत बघा. कालांतराने एकमेकांना जपायला लागाल. आत्ता कुठे त्याबद्दल भांडताय?"

विवाहपूर्व समुपदेशन हे इतर कोणत्याही समुपदेशनापेक्षा निराळे आहे. वर वधू यांच्या विचारधारेला स्पष्टता यावी यासाठी हे समुपदेशन असते. शिवाय जोडीदाराबद्दलच्या अपेक्षा ठरवताना सुद्धा याचा उपयोग होतो. त्याच प्रमाणे निर्णय घेण्यासाठी देखील त्याचा उपयोग होऊ शकतो. कधी कधी काही जिव्हाळ्याच्या गोष्टी मनाशी जपलेल्या असतात. त्याबद्दलही लग्ना आधीच बोलणे गरजेचे आहे.. नाहीतर त्या गोष्टी भांडणाचे मुद्दे ठरू शकतात.

जयेश – त्याने असं ठरवलं होतं कि नोकरी लागली की दर महिना पगाराच्या दोन टक्के रक्कम कुठल्यातरी सेवाभावी संस्थेला दान करायची. त्याप्रमाणे तो दर महिना ते तसे करीत असे. सहा महिन्यांपूर्वी त्याचे सुरभी शी लग्न झाले. त्याला पगार होता रु. सत्तर हजार. दोन टक्के रक्कम म्हटली तरी ती होत होती सुमारे १४००/ रुपये.

हि गोष्ट त्याची पत्नी सुरभीला अजिबात मान्य नव्हती. तिचे म्हणणे रु १४०० /-- फारच होतात. ३००/४०० रु. दे.

पण त्याच्या आठवी नववी च्या इयत्तेपासून त्याने हे स्वप्न जपले होते. तो तिला म्हणाला १५०० रु पगार कमी आहे मला असे समज. पण या गोष्टी वरून वाद वाढत गेले आणि प्रकरण घटस्फोटापर्यंत आले.

अशा जिव्हाळ्याच्या गोष्टी लग्नापूर्वीच आपल्या भावी जोडीदाराला सांगायला हव्यात. अनेक वधू वरांशी बोलताना जाणवलेली महत्वाची गोष्ट अशी की धार्मिक बाबी किंवा अध्यात्मिक गुरु याबद्दलही आपल्या धारणा लग्नापूर्वीच एकमेकांना सांगायला हव्यात. अद्वैत अशाच कोणत्यातरी मठात दर शनिवारी संध्याकाळी जात असे. लग्नापूर्वी त्याने हे अमिताला, त्याच्या पत्नीला सांगितलेच नव्हते. लग्नानंतर जेव्हा अमिताला हे कळले तेव्हा तिला धक्काच बसला, कारण तिच्या विचारधारेत, तिच्या आयुष्यात या गोष्टींना स्थानच नव्हते. आणि दर शनिवार त्यातच जाणार म्हटल्यावर तर ती चिडलीच.

अशा अनेक गोष्टींचा विचार लग्नापूर्वी होणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे एकमेकांच्या आई वडिलांचे स्थान आपल्या आयुष्यात काय असणार, दोघांचेही पालक किती अंतरावर असतील याचा विचारही पती पत्नी दोघांनी मिळून लग्नापूर्वी करणे गरजेचे आहे.

चिन्मय आणि त्याची पत्नी राधा दोघेजण राहतात बंगळूरू येथे. आणि चिन्मयचे आई बाबा राहतात मुंबईला.

चिन्मय च्या आईने त्याला नियमच घालून दिला होता कि रोज राधा काय स्वयंपाक करते ते चिन्मयने तिला रोज फोन करून सांगितलेच पाहिजे. शिवाय राधाने रोज चटणी कोशिंबीर पासून सगळा स्वयंपाक केलाच पाहिजे . अशा बाबतीत खरं तर चिन्मय आणि राधा दोघांनी मिळून आईला काय सांगायचे ते ठरवले पाहिजे. अशा लहान सहान बाबतीत खरं तर पालकांनी पडण्याचे काही कारण नाही. पण आपल्या मुलांवर ( लग्नाच्या वयाच्या ) पालकांची स्वामित्वाची भावना असल्याचे दिसून येते. आणि पती पत्नी नात्यात अंतर पडत जाते.

मुला मुलींशी बोलताना अजून एक जाणवलेला महत्वाचा मुद्दा म्हणजे त्यांचे मित्र मैत्रिणी !!!! या बाबतीत सुद्धा लग्नापूर्वीच बोलणे आवश्यक आहे. आपापल्या मित्र मैत्रिणींना लग्नानंतर किती अंतरावर ठेवायचे, याचेही भान दोघांनाही असायला हवे.

नरेंद्र आणि त्याची मैत्रीण समिता. त्यांच्या मैत्री बद्दल नरेंद्रने त्याच्या पत्नीला काहीच सांगितले नव्हते. लग्नानंतर कुठूनतरी त्याच्या पत्नीला नरेंद्र आणि समिताच्या मैत्री बद्दल समजले, आणि तिला धक्काच बसला. ती त्याला म्हणाली मला हे नाही आवडणार. तर तू मैत्री बंद कर. त्याने तिला खोटेच सांगितले की हो मी बंद केली आहे मैत्री.

पण प्रत्यक्षात मात्र तसे काही घडले नाही. एकमेकांवर खूप आरोप प्रत्यारोप झाले. त्याच्या पत्नीच्या मनात त्याने फसवल्याची आणि तो तिच्याशी खोटे बोलल्याची  भावना घर करून बसली आणि पर्यायाने ते नाते जुळणे अवघड झाले.

अशी अनेक उदाहरणे !! एक मात्र नक्की पती पत्नीचे नाते जर पक्के बांधले गेले आणि ते टिकवण्यासाठी दोघांनीही मनापासून प्रयत्न केले तर विवाहसंस्थेला बसणारे हादरे नक्की कमी होतील आणि आपल्या सामाजिक स्वास्थ्याचा पाया मजबूत होईल यात मला शंका वाटत नाही..............